# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज,पिंजर
# ता.बार्शीटाकळी जि.अकोला

## "महाविद्यालयाच्या सामाजिक कार्याचा अहवाल"

### वर्ष २०२४-२५

1. **प्रस्तावना (Introduction):**

- भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्ट्स कॉलेज,पिंजर या महाविद्यालयाने सामाजिक दायित्व फंड या विभागाची निर्मिती सन २०१९ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार केली असून महाविद्यालयाचे सामाजिक दायित्व म्हणजे फक्त शिक्षण देणे नसून समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घेणे, जसे की ग्रामीण भागातील गरजूंपर्यंत मदत पोहोचवणे, आरोग्य शिबिरे घेणे, पर्यावरणाचे रक्षण करणे (वृक्षारोपण), आणि विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव व सेवाभावी वृत्ती शिकवणे, जेणेकरून ते जबाबदार नागरिक बनतील आणि समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडतील, असे अनेक उपक्रम महाविद्यालयाने वर्ष २०२४-२५ मध्ये राबविलेले आहेत.

**उद्दिष्ट्ये (Objectives):**

- विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना वाढवणे.
- सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सक्षम करणे.
- स्थानिक समुदायाला मदत करणे (उदा. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता).

**केलेले उपक्रम (Activities Undertaken):**

- **पर्यावरण:** वृक्षारोपण, जलसंधारण.
- **आरोग्य:** स्वच्छता मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे.

**स्वच्छता मोहीम:**

तरुण भारत
Akola Main | 2024-09-25 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा




स्वच्छता अभियान रॅलीत सहभागी शिक्षक व विद्यार्थी

◆ **पिंजर, २४ सप्टेंबर**

येथील भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् महाविद्यालयात शनिवार, २१ सप्टेंबर रोजी स्वच्छता सप्ताहाचा समारोप झाला. यावेळी महाविद्यालयाचे डॉ. अशोक वाहुरवाघ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

येथील भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. शनिवार, २१ सप्टेंबर रोजी या कार्यक्रमाचा समारोप संपन्न झाला. यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेच्या पूजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना डॉ. वाहुरवाघ यांनी संत गाडगे बाबा यांच्या जीवनातील काही प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले व स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या पंधरवड्यात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

समारोपीय कार्यक्रमानिमित्त पिंजर येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सुनील मनवर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. स्वच्छता रॅलीमध्ये डॉ. मनोज फडणीस, डॉ. नानासाहेब सपकाळ, डॉ. रामकृष्ण गावंडे, प्रा. रणजीत हिवराळे, डॉ. पंकज तायडे, संतोष गिरी, श्याम खापर्डे, विनोद सुर्वे, गंगाराम वानखडे, आनंदा विजयकर, इत्यादींनी सहभाग घेतला त्याचबरोबर बहुसंख्य विद्यार्थ्यांनीसुद्धा पिंजर परिसरात स्वच्छता अभियान राबवून सहभाग नोंदविला.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

महाविद्यालयाच्या वतीने दि.२२ जून २०२५ रोजी भाऊसाहेब लहाने यांचा १०३ वा जयंती उत्सव विविध लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. जयंती उत्सवाचे औचित्य साधून महाविद्यालय व अकोला येथील डॉ. रावणकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोगनिदान शिबिर घेण्यात आले. आरोग्य शिबिरामध्ये डॉ. अमोल रावणकार, डॉ. अविनाश पाटील, डॉ. संदीप इंगळे, डॉ. सुमित खुपसे, डॉ. अमर भुईभार, डॉ. पूजा भेलके, डॉ. दीप्ती शेळके आदी डॉक्टरांनी १७० रुग्णांची तपासणी व रक्तगट तपासणी करून औषधे दिलीत. याप्रसंगी भाऊसाहेबांचा चाहतावर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.



.



तरुण भारत
Akola Main | 2025-06-27 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# स्व. भाऊसाहेब लहाने जयंती उत्सव उत्साहात

◆ **पिंजर, २६ जून**

येथील भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेजच्या ज्ञानरंजन सभागृहात स्व. भाऊसाहेब लहाने यांचा १०३ वा जयंती उत्सव विविध लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. जयंती उत्सवाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुबोधचंद्र लहाने होते.

जयंती उत्सवाचे औचित्य साधून संपूर्ण लहाने परिवार व अकोला येथील डॉ. रावणकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रोगनिदान शिबिर घेण्यात आले.

या कार्यक्रमात मंचावर सुनील राजे, भानुदास कराळे, जनार्दन राऊत, रमेश आप्पा खोबरे, गजानन आप्पा मळगे, विकास लहाने, डॉ. सुमित खुपसे व आयोजक डॉ. अमोल रावणकार उपस्थित होते. स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या पुतळ्याने पूजन मान्यवरांनी केले.

शिबिरात सहभागी सर्व डॉक्टरांचा शाल, श्रीफळ व 'आठवणीतले भाऊसाहेब' ही स्मरणिका देऊन सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे सेवानिवृत्त कर्मचारी आनंदा विजये यांचा निवृत्तीपर सत्कार घेण्यात आला. डॉ. सुबोधचंद्र लहाने यांनी कपडे व भेटवस्तू देऊन विजये यांचा तर साडीचोळी देऊन सौ. विजये यांचा सत्कार डॉ. शैलजा लहाने यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठाच्या क्रिकेट टीममध्ये व कोटा येथे निवड झाल्याप्रीत्यर्थ आदित्य प्रसन्न लहाने याचा त्याच्या पालकांसह सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभानंतर महाविद्यालयाच्या 'मोतीपुष्प' या वार्षिक अंकाचे अनावरण मान्यवरांनी केले.



डॉ. अमोल रावणकार यांचा सत्कार करताना डॉ. सुबोधचंद्र लहाने

यावेळी सुनील राजे, भानुदास कराळे व रमेश खोबरे यांनी स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. सुबोधचंद्र लहाने यांनी स्व. भाऊसाहेबांची निस्पृह वृत्ती कथन केली. स्व. भाऊसाहेब लहाने यांच्या जयंतीप्रीत्यर्थ आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. आरोग्य शिबिरामध्ये डॉ. अमोल रावणकार, डॉ. अविनाश पाटील, डॉ. संदीप इंगळे, डॉ. सुमित खुपसे, डॉ. अमर भुईभार, डॉ. पूजा भेलके, डॉ. दीप्ती शेळके आदी डॉक्टरांनी १७० रुग्णांची तपासणी व रक्तगट तपासणी करून औषधे दिलीत. आरोग्य शिबिराचे नियोजन करणारे अक्षय लहाने, प्रेम लहाने, प्रदीप लहाने, श्रीअक्का साबळे, पल्लवी रावणकार, तथा ज्ञानप्रकाश कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विनोद खारोडे यांनी केले तर संचालन डॉ. मनोज फडणीस यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. पंकज तायडे यांनी केले. याप्रसंगी भाऊसाहेबांचा चाहतावर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.

आरोग्य शिबिरानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला. शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web

- **सामाजिक जागरूकता:** महिला सक्षमीकरण यांसारख्या विषयांवर महाविद्यालयात दि.१२ मार्च २०२५ ला कार्यक्रम घेण्यात आला .



- **गरजूंची मदत:** अन्नदान, वस्त्रदान, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप.

महाविद्यालयाने श्रीमती मंगलाबाई सुनील घनगाव या विधवा व अनुसूचित जातीच्या महिलेला दत्तक घेतले असून सदर महिलेला महाविद्यालयाने चौकीदाराचे काम देऊन रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच त्यांच्या राहण्याची विनामूल्य व्यवस्था केली आहे. त्याचप्रमाणे सदर महिलेला दोन मुली आहेत. १) स्वीटी सुनील घनगाव २) राजश्री सुनील घनगाव या दोन्ही मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी महाविद्यालयाने घेतली असून स्वीटी घनगाव हिचे पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले आहे तर राजश्री घनगाव बि.ए. भाग २ शिक्षण घेत आहे.

महाविद्यालयाच्या सामाजिक दायित्व फंडातून समाजातील गरजू व पिडीत लोकांना देखील मदत केली जाते. एखाद्या कर्मचाऱ्यावर आकस्मिक संकट आल्यास सदर फंडातून त्याला मदत करण्याचे काम प्रामुख्याने महाविद्यालय गेली दहा वर्षापासून करीत आहे.

सत्र २०२४-२५ मध्ये सामाजिक दायित्व अंतर्गत काही गरजूंना केलेल्या मदतीचा लेखा जोखा

| दिनांक | मदत घेणाऱ्याचे नाव | मदतीचे कारण | रक्कम |
|---|---|---|---|
| १४/०४/२०२४ | संजय शामराव विजयकर | आजार | १०,००० |
| १२/०७/२०२४ | प्रवीण विठाळे | आजार | १३,००० |
| १३/०८/२०२४ | कल्पना खुशाल सरकटे | आजार | १५,००० |
| १२/१२/२०२४ | सद्भावना फंड | निराधार मदत | १०,००० |
| ०४/०२/२०२५ | रवींद्र सदांशिव | आजार | १५,००० |

- **जलसंधारण:** नाल्याचे पाणी अडवणे म्हणजे जलसंधारणा**चा** एक महत्त्वाचा उपाय आहे, ज्यामध्ये पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते जमिनीत मुरवण्यासाठी किंवा साठवण्यासाठी नाल्यांमध्ये मातीचे किंवा सिमेंटचे बांध (बंधारे) घातले जातात; यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरींना पाणी मिळते आणि दुष्काळ टाळण्यास मदत होते. अश्याच प्रकारचा बांध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दत्तक ग्राम टिटवा येथे बांधून विद्यार्थ्यांनी आदर्श निर्माण केला.


GPS Map Camera
Titawa, Maharashtra, India
Titawa, Maharashtra 444405, India
Lat 20.481064° Long 77.27422°
26/02/2025 11:27 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Titawa, Maharashtra, India
Titawa, Maharashtra 444405, India
Lat 20.481083° Long 77.274187°
26/02/2025 11:28 AM GMT +05:30
Google